# छावणी श्री गणेश महासंघाचे वेगळेपण जपा - पोलिस आयुक्त प्रवीण पवार

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

शहरांपेक्षा एक दिवस उशिराने छावणीतील गणपतीचे विसर्जन होते. असे उदाहरण महाराष्ट्रात कुठेच नाही, हे आयकॉनिक असून शहरांपेक्षा वेगळे आहे. असे सांगत छावणी चे हे वेगळेपण छावणी श्री गणेश महासंघाने जपावे असे आवाहन पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी केले. रविवारी (दि. ७) पोलिस आयुक्तांच्या हस्ते छावणी श्री गणेश महासंघाच्या गणपतीची आरती करून विसर्जन करण्यात आले. उत्सव समितीचे अध्यक्ष विशाल दाभाडे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

पुढे बोलतांना पोलिस आयुक्त म्हणाले की, कायदा व सुव्यवस्था राखत सर्वच गणेश भक्तांनी यंदाचा गणेशोत्सव साजरा केला.

पोलिसांना प्रत्येकाचे सहकार्य असल्याने हा गणेशोत्सव उत्साहात साजरा झाला तर अध्यक्ष विशाल दाभाडे म्हणाले की, यंदाचा गणेशोत्सव डीजे मुक्त आणि नशामुक्त संकल्प साजरा करण्यात आला. गणेशोत्सवात मैदानी खेळाला अधिक प्राधान्य देत समाजाभिमुख उपक्रम छावणी श्री गणेश महासंघाने राबविले आणि त्याला छावणी परिसरातील श्री गणेश भक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मला छावणी श्री गणेश महासंघाचे अध्यक्षपद दिल्याबदल समस्त छावणी करांचे आभार यावेळी अध्यक्ष विशाल दाभाडे यांनी मानले. यावेळी छावणी श्री गणेश महासंघाचे मुख्य मार्गदर्शक अशोक सायन्ना यादव यांनी प्रास्ताविक केले. यावेळी पोलिस उपायुक्त पंकज अतुलकर, अतिरिक्त पोलिस आयुक्त संजय सानप, छावणी पोलिस ठाण्याचे निरीक्षक डॉ. विवेक जाधव, कार्याध्यक्ष रखमाजी जाधव, याप्रसंगी छावणी परिषदेचे सदस्य प्रशांत तारगे, माजी उपाध्यक्ष करणसिंग काकस, माजी उपाध्यक्ष संजय गारोल, पुरुषोत्तम ठाकूर, अशोक शहा, यशपालसिंह ओबेरॉय, पप्पू वर्मा, एम ए अझर, महासचिव विनोद साबळे, कुमार गांजले, देवानंद मदनानी, सचिन म्हस्के, मनोज टोपीवाला, धीरेन चौधरी, विजया भोसले, अश्विनी गायकवाड, मीनाक्षी आमराव, मंगल कस्तुरे, पूजा अडचित्रे, रोहीत सोळसे, अक्षय तुपे, प्रमोद आंबेवाडीकर, बाळू वाघ, धीरज गुज्जर, किशोर क्षत्रिय, संतोष शेळके, दिनेश सुखदान, अभिजीत गंगावणे, सचिन मस्के, विशाल काकडे, प्रसिद्धी प्रमुख सचिन लिला सुखदेव अंभोरे यांच्यासह अनेक गणेश भक्त कार्यकर्ते या प्रसंगी उपस्थित होते.



## सन्मानाशिवाय भक्ती नाही - लालबागच्या राजाच्या अन्यायी मंडळाला विरोध करा..

लालबागचा राजा - श्रद्धेचं प्रतीक असावा, पण इथे दरवर्षी काय चालतंय? श्रद्धेच्या नावाखाली भाविकांचा अपमान! लांबून लांबून येणाऱ्या भक्तांना कोणताही आदर नाही, कोणतीही व्यवस्था नाही. उलट त्यांना ढकलाढकली, अपशब्द, आणि हकलपट्टीला सामोरं जावं लागतं.

दरवर्षी असंख्य भक्त या गर्दीत अडकतात, तासन्तास उन्हात उभे राहतात आणि शेवटी जेव्हा गणरायाच्या दर्शनासाठी पुढे जातात, तेव्हा त्यांना सन्मनाऐवजी त्रास मिळतो. काही कार्यकर्ते खुलेआम अपमान करतात - हट रे, ङ्गलवकर जा, इकडे नको उभा राहू असे शब्द ऐकून भाविकांचे मन दुखावते. गरीब आणि सामान्य लोकांसाठी लांबच लांब रांगा लावून त्यांचा छळ केला जातो, आणि पुढाऱ्यांसाठी विशेष व्हीआयपी मार्ग ठेवून त्यांचा सन्मान वाढवला जातो. ही श्रद्धेची जागा आहे की सत्तेचा आणि दिखाव्याचा बाजार? २०२५ मध्येही हाच प्रकार सुरू आहे. बदल काहीच नाही. भक्तांची सेवा करण्याऐवजी त्यांना त्रास देण्याचा परंपरागत कार्यक्रम जणू चालूच आहे!

आता पुरे झाले!

भाविकांनो, आपण का जाऊ त्या ठिकाणी जिथे आपल्याला अपमान सहन करावा लागतो? श्रद्धेच्या नावाखाली आपल्याला ढकलून, ओरडून, अपमानित करणाऱ्यांसाठी आपण का त्रास घ्यावा?

माझी स्पष्ट आणि ठाम विनंती - लालबागच्या राजाचे दर्शन घरी बसूनच घ्या! जिथे सन्मान नाही, तिथे जाणं म्हणजे स्वतःचा अपमान स्वीकारणं आहे.

गणरायाची कृपा भक्तांच्या मनावर असते, गर्दीवर नाही. आपला आत्मसन्मान जपणं हेही श्रद्धेचं कर्तव्य आहे. आपण आपल्या कुटुंबासोबत घरी उत्सव साजरा करूया आणि या अन्यायाला विरोध करूया. जिथे भक्तांचा अपमान होतो, तिथे न जाणं हेच एक उत्तर आहे.

**लेखक - डॉ. अभिलाष डावरे-(पत्रकार)**
७७४३८५५५४४

## महाराष्ट्रात अनुकंपा आधारावर होणार मेगा भरती!, १०,००० रिक्त पदे भरली जाणार

मुंबई : दिवाळीपूर्वी सरकारी कर्मचाऱ्यांना शासनाकडून मोठी भेट दिली जाणार आहे. अनुकंपा आधारावर (अर्पीज्ञरारि ठशर्लीळींशपीं) भरतीचा अनुशेष भरण्यासाठी सरकार १० हजार लोकांची मेगा भरती करणार आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार अनुकंपा नियुक्तीची तब्बल १०,००० रिक्त पदे त्वरित भरण्याचा राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या अनुकंपा आधारावर भरतीचा प्रश्न सुटेल आणि राज्यातील हजारो कुटुंबांना दिलासा मिळेल.

राज्यातील सरकारी आणि निम सरकारी कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचा त्याच्या सेवाकाळात मृत्यू झाल्यास, त्याच्या कुटुंबातील पात्र वारसांना त्या विभागात नोकरी दिली जाते, ज्याला अनुकंपा धोरण म्हणतात. अनुकंपा धोरण १९७३ पासून लागू आहे आणि त्यात वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. या धोरणानुसार, गट-क आणि गट-ड पदांमधील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना ही सूट मिळते. त्याचप्रमाणे, राज्यातील अनुकंपा नियुक्त्या बऱ्याच काळापासून रखडल्या होत्या. नगरपालिका, जिल्हा परिषदांसह स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनुकंपा तत्वावर भरती केली जाते.


बळीराम नाईक शिक्षण प्रसारक मंडळ, थापटी तांडा संचलित, संत ईश्वरसिंह कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आडूळ. ता. पैठण, जि. औरंगाबाद

रोखठोक वृत्तपत्र अट्टलमत च्या वर्धापनदिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

- शुभेच्छुक -


**श्री. कल्याणराव राठोड**
अध्यक्ष, बळीराम नाईक शिक्षण प्रसारक मंडळ, थापटी तांडा, ता. पैठण, जि औरंगाबाद


**संतोष राठोड**
स्थानिक निवड समिती, अध्यक्ष


**डॉ. हारून शेख**
प्राचार्य, संत ईश्वरसिंह कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आडूळ, ता. पैठण, जि. औरंगाबाद

अट्टलमत च्या वर्धापनदिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !



A PAWAR CONSTRUCTION
Registration Number : 27CDJPP4754Q1ZL

ANKUSH MOTIRAM PAWAR
Address- 3rd Floor, F -40/3, Post Office Road, CIDCO N-7, Chhatrapati Sambhajinagar, Aurangabad, Maharashtra, Mo.No. 9823424444 9923382777

अट्टलमत च्या वर्धापनदिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !



M/s. Adhira Petroleum
Authorised Dealer : Hindustan Petroleum Corporation Ltd.
Gut No. 24, Mambapur Village, NH-211, Kasabkheda, Tq. Khultabad. Dist, Aurangabad-431 002 (M.S.)
Email-adhirapetroleum@gmail.com


हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199